श्रीनिवास हेमाडे, "*व्हाय सेड इट? !* "(आर. के. लक्ष्मण यांच्या व्यंगचित्राचे तात्त्विक विश्लेषण ) वसा, ऑक्टोबर- २००९ दिवाळी अंक, वर्ष सातवे, पान ३६ ते ४६, संपादक : प्रभाकर नारकर, कबीर प्रकाशन, १९ए/४०२, अक्षर पत्रकार सोसायटी, मागठाणे, बोरीवली(पू), मुंबई ६६

---

*The day that the quality of our leaders improve I will have to retire and go*

- R K Laxman

# *व्हाय सेड इट ?*

श्रीनिवास हेमाडे ९१६८६५ ८०६६



भारताला दोन आर.के.ंची देणगी मिळालेली आहे.पहिला आर. के.म्हणजे राज कपूर आणि दुसरा आर.के.लक्ष्मण.दोघेही तसे समकालिनच. या दोघांनी ही आपआपल्या रितीने भारताचा इतिहास खऱ्या अर्थाने चित्रित केला.राज कपूरचे सिनेमे भोळ्या भाबड्या सुशिक्षित पण कंगाल नायकाचे होते. '' जागो मोहन प्यारे ' म्हणत विश्वातल्या इहवादी मांगल्यावर विश्वास ठेवणारा तो आशावादी नायक काहीसा समाजवादी कम्युनिझमकडे झुकणारा होता.हा तत्कालिन भारतीय नायकाचे जणू प्रतिनिधीत्व करीत होता.

'यू सेड इट!' चा नायकही भारताचे प्रतिनिधीत्वच करणारा आहे. जगप्रसिध्द कार्टूनिस्ट आर. के. लक्ष्मण (रासीपुरम कृष्णस्वामी लक्ष्मण ) यांची ही कार्टून मालिका भारत स्वतंत्र झालेल्या दिवसापासून टाईम्स ऑफ इंडिया, महाराष्ट्र टाईम्स आणि नवभारत टाईम्सच्या पहिल्या पानावर प्रसिध्द होत आली आहे.व्यंगचित्रांनी वृत्तपत्राच्या पहिल्या पानावर एका वेगळ्या तऱ्हेचा इतिहास रोजच्या रोज सतत अर्धशतक मांडत यावा ही नवलाची गोष्ट आहे, यात शंका नाही.बखरकारांचा इतिहास नेहमीच राजेरवाडे,त्यांची विलासी राहणी आणि भाऊबंदकी यांच्याभोवती फिरत राहिली, ती नियोजन करुन लिहीली गेल्याने पक्षपातीही झाली.पण 'इतिहास खरा सामान्य माणसाचाच असतो' , ही टॉलस्टॉयची उक्ति सिध्द करुन दाखवणारा खरा चित्रमय इतिहास लक्ष्मण यांच्या चिंत्रानी निदान भारतापुरता तरी मांडला, ही अद्वितीयच बाब आहे.त्यामुळे एका अर्थाने ते ''*स्वतंत्र भारताचे व्यंगचित्र बखरकार* '' च ठरतात, असे म्हणणे अनुचित होणार नाही.'व्यंगचित्रे' ही इतिहास लेखनाची पध्दती असू शकते,हा विस्मयचकित करणारा वस्तुपाठच त्यांनी घालून दिला.

देशातील पहिली सार्वत्रिक निवडणूक, पं.नेहरुंची पंचवार्षिक योजना,चीन - भारत युध्द,भारत-पाक युध्द, इंदिरा कालखंड ते आणीबाणी,राजीव गांधी शासन ते प्रादेशिक पक्षांचा सुकाळ,बाबरी मशीद प्रकरण ते आर्थिक उदारीकरण, भाजपचे राज्य ते कॉन्ग्रेसचे पुरागमन,उरलेला आणखी आजपर्यंचा अत्याधुनिक काळ या सर्वांचा वेध लक्ष्मण यांच्या व्यंगचित्रांनी घेतला.त्यांचा चित्रमय इतिहास अतिशय संवेदनशील,स्फुरणदायी आणि विनोदी ठरला.' ब्रशिंग अप द इयर्स' हे त्यांचे पुस्तक म्हणजे भारताची जिवंत बखरच ठरते.

जगप्रसिध्द 'टाईम' मासिकाने त्यांना 'भारताचा सर्वात टोकदार व्यंगचित्रकार' म्हणून गौरविले आहेच. या गौरवावर आंतरराष्ट्रीय पातळीवर 1984 ला रॅमन मॅगसेसे पुरस्काराने कळस चढविला.डॉ.बाबासाहेब

---

आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने डी.लिट.ही पदवी प्रदान केली.अगदी अलिकडे त्यांना सीएनएन - आयबीएन ' वाहिनीने ' जीवन गौरव पुरस्कार देवून सन्मान केला.19 जानेवारी 2008 रोजी पुण्यातली एस.एम.जोशी सभागृहात श्री.अजित केळकर यांचा 'कॉमन मॅन शो' सादर करण्यात आला.हा ही त्यांचा एक सन्मानच होता. त्यांच्या मानसन्मानाची यादी करणेही कठिण आहे.त्यांना 'भारतीय व्यंगचित्रकारीतेचे शेक्सपीअर' म्हंटले जाते.या उपाधीत वावगेकाहीच वाटू नये , इतकी उंची लक्ष्मण यांनी गाठली आहे.लक्ष्मण म्हणजे राजकीय विनोद निर्माण करणारी,समजावून देणारी , प्रसारीत करणारी 'एकव्यक्ति संस्थाच ' आहे.

लक्ष्मण यांच्या व्यंगचित्रांचे आशयद्रव्य त्यांना मिळाले ते भारतीय भूमीतच. त्याबद्दल भारतीय नेते आणि भारतीय प्रजा यांचे ते ऋण व्यक्त करतात.अर्थात नेत्यांची अतिपुष्ट बेढब व प्रजेची लत्कर शरीरयष्टी, या दोघांची सुंदोपसुंदिची दैनंदिनी आणि अवाढव्य भूप्रदेश हा व्यंगचित्राचा कच्चा मसाला त्यांना सातत्याने पुरता झाला.आजही तो जणू दशांगुळ पुरून उरतो आहेच.व्यायामच नसल्याने शरीराचा बेढबपणा हाच जणूकाही 'नेत्याचा आकार' असतो (जसा बाईचा 36 -24- 36 असावा.सॉरी बरं का ! ) आणि प्रजेचे खंगलेले पोटपाठ यांच्यातील अद्वैत हा सुध्दा 'प्रजेचा आकार' असावा, अशी अंधश्रध्दाच नेत्यांनी बाळगल्याने लक्ष्मणकला (की रेखा ? ) काटेकोरित्या टोकदार आणि जोमदार बनली !

अर्थात लक्ष्मण यांच्यासारख्यांची पोटे भरावीत या उदात्त हेतूने नेत्यांचा दर्जा सुमार असावा, प्रजा कुपोषित राहावे ही सदिच्छा बाळगणे विकृतीचे लक्षण आहे,यात शंका नाही.निदान लक्ष्मण ज्या अर्थाने म्हणतात त्या अर्थाने व्यंगचित्रकाराला, विनोदी - विडंबन लेखकाला मसाला पुरविणे नीचपणाच आहे.म्हणजे बुध्दाला , महावारीला,गांधींना काम मिळावे म्हणून जगात दुःखनिर्मिती करण्याचा व्यवसायच जर कुणी करु लागला, तर तार्किक विश्लेषक आणि तत्त्वज्ञ मंडळींचेच दुकान चालेल ! पण तत्त्वज्ञ सुध्दा मंडळी तशी नसतातच ना !!

के. शंकर पिल्लई हे भारतातील आद्य व्यंगचित्रकाराचार्य.त्यांनंतर रंगा उर्फ एन.के. रंगनाथन,बीएन.राममूर्ती ('मि. सिटीझन' चे कर्ते), अबु इब्राहिम, माया कामत हे पहिल्या फळीतील व्यंगचित्रकार होते.अलिकडील ताज्या दमाचे शेखर गुरेरा,सुरेश सावंत , पाकिस्तानातील शुजात अली हे नामांकित व्यंगचित्रकार आहेत.पण या नकाशात आर.के. लक्ष्मण यांचे स्थान एकमेवाद्वितीय आहे.

या कॉमन मॅनला केद्र ठेवून राजकीय व्यंगचित्रे रंगविली गेली असल्याने आपण मुळात व्यंगचित्र म्हणजे काय ? त्याच्या अंगभूत सामर्थ्यामुळेच तेच कसे 'राजकीय व्यंगचित्र' बनते ते पाहू. त्यामुळे लक्ष्मण यांच्या राजकीय व्यंगचित्राचा अन्वयाथे लक्षात येवू शकेल.

कार्टूनचा इतिहास

कार्टूनचा इतिहास तसा प्राचीन आहे. गुहाचित्रे ही पहिली व्यगचित्रे समजली जात असली तरी 16व्या शतकाच्या 1590 मध्ये इटालिय बंधू ॲनीबेल आणि ॲगोस्तीनी कार्रस्सी यांनी काढलेली 'रिट्रातीनी कारीची' (ritratini carichi) ही मालिका पहिली व्यंगचित्रे समजली जातात.Carichi या शब्दापासून caricature हा शब्द बनतो.त्यानंतरच्या शतकात साऱ्या युरोपात आणि जगातच ही लाट पसरली.पण क्रांतीकारक, बंडखोर यांच्याप्रमाणे व्यंगचित्रकारांनाही सत्ताधिकाऱ्यांच्या क्रोधाग्नीत भस्म व्हावे लागले.

अगदी अलिकडचे सांगावयाचे तर 1944 दरम्यान अनेक पोलिश व्यंगचित्रकारांना नाझीनी ठार केले.1970 ला टर्की व्यंगचित्रकार तुरहान सेलकुक यास भयानक छळाला तोंड द्यावे लागले.अगदी गेल्या दशकात 'द प्राफेट कार्टून' गाजले तर भारतात हुसेन,लक्ष्मण यांनाही अनेक संकटांना तोंड देणे भाग पडले.डेविड लो हे जसे जागतिक व्यंगचित्राचे पितामह समजले जातात तसा मान भारतात के.शंकर पिल्लई यांना जातो.आज 'कार्टून जर्नालिझम ' ही नवी अध्ययन शाखाही विकसित होत आहे.

कार्टून्स ही चित्रकथी असते.ती कथनाचा आभास निर्माण करते.''साहित्यपूर्ण भाषेचा अलंकार लेवून येणाऱ्या संहितेची अथवा निवेदनाची जागा मोठ्या चलाखीने हस्तगत करणे'' हे कार्टुनमागचे तत्त्वज्ञान

असते.संहितेने धारण केलेला भाषेचा बोजवारा आणि अवडंबर टाळणे; त्याच वेळी संहितेचा संदेशवितरणाचा हेतू सुध्दा साध्य करणे, हा गनिमी कावा कार्टूनमागे असतो.

संहितेच्या अत्यंत प्राथमिक कच्च्या रुपातील प्रतिमानांशीच एका अर्थाने नाते सांगण्याचा प्रयत्न कार्टून करीत असते.कोणतीही भाषा प्राथम्याने चित्ररुपातच असावी याचे हे एक महत्वाचे कारण असावे.म्हणून बालकांना आधी चित्रे समजतात, ती काढण्याचा प्रयत्न ती करतात, मग कालांतराने ती अक्षरे,कित्ता गिरवू लागतात.( चित्रमय भाषा प्रभावी असल्याने की काय पण चीनची चित्रलिपी आजही गोटीदार बाळसे धरुन आहे.)

कार्टून नेमकी हीच नस पकडते आणि संदेश संप्रेषणाचे काम अतिसुकर करते. हा संदेश त्वरित लक्षात येतो.अर्थात नेमाक कोणता संदेश दिला जाईल ? हे संदेश ग्रहण करणाऱ्यावरही अवलंबून असू शकते. साधारणतः कार्टूनमधून दोन प्रकारे संदेश दिला जावू शकतोः

एक - त्या व्यंगचित्राच्या विषयाचे अस्तित्वच नाकारणे आणि दोन - त्या विडंबनाचेच आणखी दर्जेदार व खुमासदार विडंबन करणे.याचा अर्थ असा की विडंबन मान्य असणारी व्यक्ति अथवा शासन इत्यादी संस्था विडंबन विषयाला जणूकाही अनैतिक मान्यता देत असतात. व्यंगचित्राला मान्यता देणे, हे या सूक्ष्म अर्थाने दोन मूल्यप्रणालीमधील युध्दच असते.ही बाब विशेषतः गेल्या दशकात जगभरात उसळलेल्या डॅनिश राजकीय कार्टून म्हणून गाजलेल्या 'प्राफेट कार्टून' प्रकरणी लक्षात येते.

इस्लामचे प्रेषित महंमद यांचे हे व्यंगचित्र 'जेलॅण्डस पोस्टन' (Jyllands - Posten ) या डॅनिश वृत्तपत्रात छापले गेले.पण त्याचा परिणाम म्हणून जगभरात व्यापक धार्मिक असहिष्णुता व प्रक्षोभ उसळल्याने अनेकांना या प्रकरणाचे वर्णन ' स्वातंत्र्य आणि लोक अपराधाचे भय यातील संघर्ष' असे करावे लागले. या प्रकरणामुळे एनबीसीने येशू ख्रिस्ताविषयीच्या 'द बुक ऑफ डॅनियल' या दूरदर्शन कार्यक्रमाचे प्रसारण व प्रकाशन तीन भागानंतर थांबविले.

## कार्टून : शस्त्र की अस्त्र ?

आता या प्रकरणातून पत्रकारांनी कोणता धडा घेतला ? किंवा त्यांच्यासह जनसामान्यांना राजकीय कार्टून ठरलेल्या या प्रकरणातून कोणता धडा मिळतो ? तर केवळ इस्लामच नव्हे तर कोणत्याही धर्माच्या मूलतत्त्ववादाला विरोध करावयाचा असेल तर त्या युध्दात कार्टून हे काही योग्य शस्त्र होवू शकत नाही.मूलतत्त्ववादासारख्या गोष्टीला तोंड देणे आणि त्याचा मुकाबला करणे गांभीर्याने घेतलेच गेले नाही तर कार्टून अभिव्यक्तिला राजकीय अभिव्यक्तिचा दर्जा मिळणे शक्य होवू शकत नाही, फार ती एक गंमत ठरते.

पत्रकारिता ही काही पोकळीत काम करणारी बाब नाही तर ती समाजातील महत्वाची कळसूत्री आहे. ''मला काय साधावयाचे आहे ? ही स्टोरी मी का लिहितो आहे? हे छायाचित्र मी का काढतो आहे ? किंवा हे कार्टून मी का छापू इच्छितो आहे.'' हे प्रश्न पत्रकाराने, पत्रछायाचित्रकाराने, व्यंगचित्रकाराने माध्यमनिरपेक्षतेने विचारलेच पाहिजेत.मग नंतर त्याने ''माझ्या ग्राहक वाचकांना, प्रेक्षकांना चांगले काही देण्याचा मार्ग कोणता आहे ?'' हे विचारले पाहिज.

याचा अर्थ कार्टुनपासून लांब पळ काढला पाहिजे असे नव्हे तर पत्रकारितेत आपण जे काही करु पाहतो त्या यादीत कार्टूनकारिता अमळ जरा दूरच असते, याचे भान जागे केले पाहिजे, हा मुद्दा अधोरेखित झाला पाहिजे.ज्यामुळे आणि जी बातमी छापलीच गेली नाही तर आपण अस्वस्थ होवू, असे विषय शोधण्यात अपयश आलेच तर राजकीय कार्टून ही मूल्यहीन गोष्ट बनते. ''आधी जरा पत्रकारीताच नीट करा आणि मग विनोद ! '' असेही म्हणणे वावगे ठरु नये.

खरे तर अभिव्यक्ति स्वातंत्र्य आणि जबाबदार बंधने यात एक सर्जनात्मक तणाव असायला हरकत नसावी.अशी कला कार्टूनमधून व्यक्त होवू शकते.कार्टून स्वतःवर विनोद करायला शिकवितात आणि त्याचवेळी

---

स्वतःला फार काही गांभीर्याने घेवू नये, हा धडाही देतातच. पण जेव्हा एखादा कार्टूनिस्ट प्रतिष्ठेची नीचतम पातळी गाठू पाहतो अथवा कुणाची तरी कशाची तरी बदनामीच करु पाहतो तेव्हा सार्वजनिक लोकहिताच्या समस्या सोडविण्यात त्याचा कोणताच सहभाग नसतो, हे लक्षात ठेवणे हवेच.जबाबदार कार्टूनिस्ट ही मर्यादा नेहमीच पाळतात आणि त्यांच्या निर्मिताचा लोकमानसावर होणारा परिणामही ओळखून असतात.

आता आपण 'राजकीय व्यंगचित्र' ही संकल्पना तपासू.

## राजकीय व्यंगचित्र

संपादकीय व्यंगचित्र म्हणजे राजकीय व्यंगचित्र.ज्या व्यंगचित्रात चित्रकाराने काही प्रमाणात का होईना पण एखादे राजकीय अथवा सामाजिक किंवा सांस्कृतिक स्वरुपाचे भाष्य केलेले असते.असे चित्र संपादकीय पानावर असावे, असा पारंपरिक संकेत असल्यामुळे त्यास 'संपादकीय व्यंगचित्र' म्हंटले जाते.तरी गेल्या काही वर्षांमध्ये ही चित्रे पहिल्या पानापासून शेवटच्या पानापर्यंत प्रवास करीत आली आहेत.ही चित्रे संपादकीय धोरणांशी सुसंगत असावीत,असाही संकेत आहेच.पण तशी ती प्रत्यक्षात असतीलच असे नाही.(शिवाय गेल्या दशकातील जागतिकीकरण कम् धंदेवाईकीकरणामुळे व्यवस्थापकीय धोरणानुसारच ती जास्त सुसंगत असल्याचेही अनुभवास येते.)बहुधा वाचकांना आवडेल तशीच व्यंगचित्रे काढण्याचीही परंपराही आहेच.

दुसऱ्या बाजूला संपादकीय धोरणांची समर्थक,टीकात्मक आणि उपहासात्मक विनोदाने ठासून भरलेली व्यंगचित्रे ही व्यक्तिगत मताभिव्यक्तिची साधने आणि त्यासाठीचा मजबूत युक्तिवाद या अर्थानेही वापरली जात आहेत.गेल्या दशकात वर नमूद केल्यानुसार महाजालावरील विविध वृत्तपत्रांच्या महाजाल आवृत्त्या आणि इतर प्रकाशने यावरही ही राजकीय व्यंगचित्रे प्रसारीत व प्रकाशित होत आहेत.विशेषतः राजकीय अल्पसंख्याक असलेले पक्ष,गट ,इत्यादी मंडळी स्वतःची मते लोकांच्या गळी उतरविण्यासाठी व्यंगचित्रे वापरीत आहेत.

याचे महत्वाचे कारण महाजाल वाचकांची संख्या दिवसेंदिवस वाढती आहे.आपल्या गावच्या , शहराच्या , राज्याच्या , देशाच्या बातम्या जगात कुठूनही पाहण्याची सोय झाल्याने संख्येत रोज भर पडते आहे. साहजिकच राजकीय व्यंगचित्रांची भर पडते आहे.एवढेच नव्हे तर रेडीमेड,आयती तयार व्यंगचित्रे देण्याचा धंदाही काहीजणांनी सुरु केला आहे, हे महाजालावरील जाहीरातीतून सहज कळेल.

लोकशाही सोडाच पण हूकूमशहा सुध्दा व्यंगचित्रकाराला आणि त्याच्या फटकाऱ्यांना घाबरतो.एखाद्या देशात किती स्वातंत्र्य आहे, हे ''त्या देशातील व्यंगचित्रकाराला किती स्वातंत्र्य आहे'', यावरून मोजता येते.या भयाची कारणे काय ? एकतर व्यंगचित्रे ही अशी कला आहे की एकाचवेळी वस्तुस्थितीचे आणि भाष्याचे चित्रण करते.साखरेच्या पाकात भिजवलेली ती कडूगोळी असते.ती मजेदार वाटते पण संदेश मात्र पोहचविते खरा.विशेषतः राजकीय व्यंगचित्राबाबत ही जास्तच प्रकर्षाने जाणवणारी बाब आहे.संपादक अथवा लेखक जे हजारो शब्दांनी मांडू शकत नाही ते एक राजकीय व्यंगचित्र सहजपणे प्रसारीत करते.

राजकीय कार्टून्स म्हणजे वास्तवात चित्रमय संपादकीयच असते.ते वेगळ्या अर्थाने सामाजिक स्वरुपाचे कलात्मक भाष्य असते.पत्रकारीतेची डूब असलेल्या राजकीय कार्टूनमध्ये राजकीय आणि कलात्मकतेचा सांधा जुळवलेला असतो.कलाकाराला आपली राजकीय मते आणि सामाजिक दृष्टिकोन व्यक्त करण्याचे ते माध्यमच असते.लिखित शब्दाच्या अतीत जावून तो 'शब्देविण संवाद' साधू शकतो.बहुतेक राजकीय कार्टून्स म्हणजे जनलोकास त्या त्या दिवसाच्या विशिष्ट राजकीय घटनांविषयी आपला दृष्टिकोन बनविण्यास मदत करण्यासाठीच असतात.

राजकीय कार्टून्सचा इतिहास 19 व्या शतकापासून ठळकपणे मांडला गेला.कार्टूनिस्ट लोकमत तयार करु लागले.विशिष्ट चिन्हवाद आणि व्यंगावर आधारलेली,नव्या ताज्या कल्पनाशक्तीशी प्रयोग करणारी राजकीय

श्रीनिवास हेमाडे, "*व्हाय सेड इट? !* " (आर. के. लक्ष्मण यांच्या व्यंगचित्राचे तात्त्विक विश्लेषण ) वसा, ऑक्टोबर- २००९ दिवाळी अंक, वर्ष सातवे, पान ३६ ते ४६, संपादक : प्रभाकर नारकर, कबीर प्रकाशन, १९ए/४०२, अक्षर पत्रकार सोसायटी, मागठाणे, बोरीवली(पू), मुंबई ६६

---

कार्टून्स लोकांना राजकारणावर ठळकपणे विचार करण्यास शिकवितात.विद्यमान परिस्थिती कायम राखणे,सामाजिक समस्यांना हात घालणे अथवा लोकांना व्यवस्था बदण्यासाठी प्रवृत्त करणे हे हेतू त्यामागे असावीत की नसावीत हा वादाचा मुद्दा असला तरी राजकीय कार्टून्सनी एकूण मानवजातीचा (म्हणजे संबंधित मानवगटाचा ) इतिहासाचा चेहरा बदललेला आहे. यात शंका नाही.

राजकीय कार्टून्सचा प्रभाव मुख्यतः अमेरिकेपासून शोधता येतो.1870च्या दशकात राजकीय कार्टून्सनी एकच धमाल केली होती.न्यूयॉर्कचा तत्कालिन राजकारणी विल्यम ट्विड याने दोन कोटी नागरिकांच्या कराच्या रकमेत प्रचंड फसवणूक केली.यात तो ज्या पक्षाचा सदस्य होता त्या Tammany Ring या गटही सामीला होता. अशा फसवणूकी त्यांना नव्या नव्हत्या (भारतात तर आजही त्या नव्या नाहीत पण जणू काही त्यांना व्यापक सामाजिक,राजकीय आश्रयच लाभल्याचे चित्र आहे.)पण ती खऱ्या रितीने चव्हाट्यावर आली ती थॉमस नास्ट या व्यंगचित्रकाराच्या चित्रमालिकांनी.नास्टच्या व्यंगचित्रांनी ट्विड व त्याचा गट संपलाच पण 'व्यंगचित्र' (Catoon) नावाची ; विशेषतः 'राजकीय व्यंगचित्र' (Political Cartoon) नावाचा इतिहासरचियता घटक जन्मला.

ट्विडच्या विरोधात जे काही छापून आले त्याबाबत त्याला आक्षेप नव्हता, कारण लोक अडाणी आणि अशिक्षित होते. (भारत व भारतासारख्या देशात आजही ते आहेत.)त्यावेळी तेथे शिक्षणाचा प्रसार झालेला नव्हता.ट्विड चिडला होता भ्रष्टाचार उघडकीस आला म्हणून नव्हे तर त्याच्यावरील व्यंगचित्रांमुळे.तो म्हणत असे ''काय लिहून येतं ते गेलं मसणात ! माझ्या मतदारांना वाचताच येत नाही. पण साली ती चित्रे बंद झाली पाहिजेत. त्या खेडवळांना ती कळतात ना !'

ट्विड व इतरांना शिक्षा झाली.काही काळाने तो तुरुंगातून पळाला.स्पेनमध्ये मात्र तो सहज सापडला.कारण बोटीवरच्या एका कारकूनाने त्याला केवळ व्यंगचित्रावरुन ओळखले.गमंत म्हणजे त्याच्या सुटकेसची तपासणी करण्यात आली तेंव्हा त्यात नोटा नव्हत्या तर नास्टने काढलेल्या व्यंगचित्रांनी ती भरलेली होती !!

या प्रकरणापासून नास्टने चांगलाच नावलौकिक आणि पैसाही मिळविला.त्याच्या व्यंगचित्रांनी संपादकीय पानावर कायमची जागा मिळविलीच पण वृत्तपत्रे, नियतकालिके इत्यादी सर्वच प्रकाशनांमध्ये व्यंगचित्र जगातच सर्वत्र अनिवार्य बनले.(त्यामुळेच तर भारतासारख्या देशात जिल्हा,तालुका,गावपातळीवरील वृत्तपत्रे,साप्ताहिके इत्यादीमध्ये सुमार दर्जाची का होईना व्यंगचित्रे असतातच.दिवाळी अंकामध्ये तर व्यंगचित्रे आणि विनोदी चित्रमालांचा एकच धिंगाणा असतो.) ''नास्टने अमेरिकेचा राजकीय इतिहासच बदलला. केवळ दोनच वर्षात नास्टने केवळ व्यंगचित्राची व्याख्याच केली असे नव्हे तर राजकीय अभिव्यक्तीची क्षमता या चित्रांमध्ये कशी दारुगोळ्यासारखी ठासून भरलेली असते हे सिध्द केले. प्रागैतिहासकालीन गुहामानवाने गुहांच्या भिंतीवर केलेल्या चित्रकलेनंतर नास्टची व्यंगचित्रकला हीच दुसरी चित्रक्रांती करणारी ठरली'', असे रॉजर फिशर हा विश्लेषक म्हणतो.

या ट्विड स्कॅन्डल स्टोरीत किती तथ्य आहे, हा मुद्दा महत्वाचा नसून एक नवाच मुद्दा उपस्थित झाला. तो असा की 'व्यंगचित्रकाराला रुढ पत्रकारितेचे नीतिशास्त्र लागू नसतेच.व्यंगचित्राची नीतितत्त्वे,मानदंड आणि व्यंगचित्रकाराचे नीतिशास्त्र त्यानेच विकसित करावयाचे असते!' नास्टला त्या एकूण प्रकरणात कदाचित काडीचाही रस नसावा पण ट्विडची शरीररचना आणि देहबोलीच अशी होती की एका दर्जेदार व्यंगचित्रकाराला आवश्यक असलेला विडंबनाचा सारा कच्चा मसालाच नास्टला गवसला.ट्विडचे व्यंग करणे आणि त्याला खलनायक म्हणून पेश करणे नास्टला सहज गेले.त्यातून त्याने ट्विडला Tammany Ring चा Boss च बनविले.खरा तर ट्विड Tammany Ring चा साधा सदस्य होता.पण नास्टने त्याला Boss Tweed असे कायांतरच केले. हा व्यंगचित्राचा आणि अस्सल व्यंगचित्रकलेचा, व्यंगचित्रकाराचा जन्म होता.ई.एच. गोम्बरिच

---

या कला इतिहासकाराच्या मते ''व्यंगचित्रकाराच्या अंगी विशेष आकृतिंना जन्म देवून जगाचे नवे मिथक रचण्याची अद्‌भूत कलाच असते.त्यातून अनोख्या मिथकजगताची निर्मितीच करतो '' (आजच्या अत्याधुनिक परिभाषेत ही विरचनावादी म्हणावी.)

कार्टूनिस्ट जे काही चितारतात ती घटना कदाचित एखाद्या दंतकथेतील परिस्थिती अथवा त्यातली व्यंगचित्राने एखाद्याच विडंबन होत असेलही पण आजूबाजूला जे घटते त्याचा तो परिपाकच असतो. कार्टून केवळ सत्यच सांगते असे नाही तर कलात्मक सत्याचेही दर्शन घडविते; मुद्रित माध्यमांना न गवसणारे एक आणखी वेगळे प्रचलित नैतिक मानदंडाच्याही वर असलेले सत्य ते प्रगट करते.विशेषतः राजकीय व्यंगचित्रांमध्ये अशी काही नैतिक आदेश असतात की जी अस्थायी पत्रकारितेला अतीत कलेच्या पातळीवर नेते.लोकमतावर परिणाम करण्याची आणि ती बदलण्याची कार्टून्सची अगाध क्षमताच त्यांना जणूकाही चित्रलिपीकडे ढकलून देते.हे चित्र जर कुणी भाषेत परिवर्तीत करण्याचा प्रयत्न केलाच ती सारी विधाने निर्जीव व बलहीन बनतील.

**परिणामकारकतेचे घटक :**

यशस्वी राजकीय व्यंगचित्रांमध्ये सर्जनात्मक विडंबनचित्रे, गतिमान परिस्थितीजन्य क्रमपरिवर्तनशीलता आणि सचोटीची क्रुध्दता असते, असे फिशर म्हणतो.तरीसुध्दा कार्टून्स प्रभाव कसा टाकतात हे नेमकेपणे शोधणे कठिण असते.काही सूचक घटक सांगता येतील.चार्ल्स प्रेसच्या मते असे चार घटक आहेत.

(1) राजकीय व्यंगचित्रे काही प्रमाणात का होईना चांगली कलात्मक कृती असते.ही कलात्मकता कार्टूनद्‌वारे दिल्या जाणाऱ्या संदेशाच्या आड येता कामा नये.

(2) छुपे सत्य उघडकीस आणण्याच्या प्रयत्नात राजकीय व्यंगचित्रे वास्तवाची अतिशयोक्ति करीत असली तरी राजकीय व्यंगचित्रात अस्सल संवेदनशीलता असली पाहिजे.

(3) परिणामकारक राजकीय व्यंगचित्र नव्या ताज्या दमाच्या साध्या सरल धारणांना वाव देणारी असावे. राजकीय व्यंगचित्रे पाहणाऱ्यांना ती एकाचवेळी धक्कादायक , गतिमान करणारी आणि विस्मयचकित करणारी होतील अशी सादर केली गेली पाहिजेत.याचा अर्थ असा की कार्टूनिस्टला जे सांगावयाचे आहे त्यापेक्षा जास्त , वेगळा अर्थ लोकांनी लावता कामा नये; त्यांच्या विचारांचे अतिक्रमण त्या व्यंगचित्रावर होता कामा नये.अन्यथा त्या चित्राचा हेतू साध्य होणार नाही.

(4) चौथा असा सांगता येईल की चांगली राजकीय व्यंगचित्रे कायमची स्मरणात राहणारी असावी.वेगळ्या शब्दात राजकीय व्यंगचित्राचा विषय कायमचा महत्वाचा असला पाहिजे.ती परिस्थिती बदलली तरी ती राजकीय व्यंगचित्रे कळाली पाहिजेत.लोकांना ती आठवली पाहिजेत.

(5) आणखी अशी भर टाकता येईल की जी राजकीय व्यंगचित्रे सरल राजकीय परिस्थितीतून निर्माण होतात ती विश्लेषण करण्यास कठिण बनतात . कारण लोकधारणा आणि लोकांची रुपके अद्‌यापि रुळलेल्या अथवा परिचयाच्या असतीलच असे नाही.

अर्थात राजकीय व्यंगचित्रे काही एक राजकीय अथवा सामाजिक सत्य सांगू पाहात असली तरी लोकांची मने बदलण्याइतपत ती जोमदार ठरतीलच असे नाही पण लोकविचार व त्यांच्या चर्चेला दिशा देणारी ठरु शकतात.विशेषतः प्रचारकी थाटात काढलेली राजकीय व्यंगचित्रे परिस्थितीशी मुकाबला करणारी व आव्हाने देणारी नसतात पण गृहीत धरलेल्या विश्वास, मूल्ये आणि पूर्वग्रह यांचा आग्रह धरणारी असू शकतात, असे फिशर म्हणतो.

राजकीय व्यंगचित्रे जर समाजात मूळ धरुन असलेली मूल्ये व्यक्त करणारी आणि सामाजिक चिन्हे वापरणारी,चिन्हवाद जपणारी असतील तर ती अधिक प्रभावी ठरतील.बघणाऱ्यांना ती चट्‌कन उजतील आणि मग त्यांना आवडो अथवा नावडो त्यांना काहीएक मत बनविण्यास भाग पाडतील, असे ही निरीक्षण फ़िशर

नोंदवितो. थॉमस नास्ट असा चिन्हवाद वापरणारा पहिला कार्टूनिस्ट होता.त्याने अमेरीकन रिपब्लिक आणि डेमॉक्रटिक पार्टीसाठी हत्ती आणि गाढव ही चिन्हे वापरली.

राजकीय व्यंगचित्रे म्हणून 19व्या शतकात महिलांच्या चित्रांना स्थान मिळाले.अर्थात 'गोऱ्या पुरूषांच्या मानदंडा' नुसारच्याच स्त्रिया चित्रांमध्ये वापरल्या गेल्या. पुरुषी नजर आणि स्त्रियांचे उदात्तीकरण या दोन घटकांनी त्या कालात स्त्रियांचा मताधिकाराची मागणी बद्दलची राजकीय व्यंगचित्रे प्रसिध्द झाली.त्यात ।अमेरिकन कार्टुनिस्ट चार्ल्स गिब्सन याच्या `epitome of American Womanhood' याची राजकीय व्यंगचित्रे विशेष गाजली,असे शेफर्ड म्हणतो. स्त्रियांच्या बाजूने जनमत तयार करण्यात, ग्रान्ट हॅमिल्टन,लोऊ रॉजर, मेरी टेलर आणि लॉरा फोस्टर यांची राजकीय व्यंगचित्रे प्रभाव टाकून गेली.

**पुरस्कार :**

राजकिय व्यंगचित्रकारांना थॉमस नास्ट, पुलित्झर,सिग्मा डेल्टा ची अवॉर्ड,हरब्लॉक अवॉर्ड,इत्यादी आंतरराष्ट्रीय पुरस्कार दिले जातातच पण स्थानिक पातळीवरही पुरस्कारांची रेलचेल असतेच.व्यंगचित्रकारांच्या Association of American Editorial Cartoonists (AAEC) ,ãããä¥ã The National Cartoonists Society या सर्वात मोठ्या संस्था असल्याचा दावा केला जातो भारतातही अशा संस्था आहेत.Indian Institute of Cartooning ही भारतातील प्रमुख संस्था असून तिचेही पुरस्कार प्रतिष्ठेचे समजतले जातात. *Attack of the Political Cartoonists हे* <u>J. P. Trostle</u> यांचे 2004 ला प्रसिध्द पुस्तक बरीच माहिती देते.

निक ॲडरसन, रेक्स मे, स्टीव् केली, मट् वुर्कर , डॅरीन बेल, सिग्नी विल्किन्सन, लिसा बेनसन, माईक लुकोविच , रेक्स बॅबिन हे काही राजकीय कार्टूनकर्ते जागतिक दर्जावरचे असून शंकर यांच्यानंतर लक्ष्मण यांचाही समावेश त्यात झाला आहे.

## व्यंगचित्रातील विनोद :

राजकीय व्यंगचित्रे म्हणजे राजकीय विनोद असतो.विनोदाचे प्रकार करता येतील. सांस्कृतिक, सामाजिक, तात्त्विक, धार्मिक,शैक्षणिक अथवा राजकीय असे प्रकार शक्य आहेत. धार्मिक अथवा राजकिय विनोद फार जपूनच करावा लागतो.एखादा धार्मिक विनोद तातडीने राजकीय विनोदात रुपांतरीत झाला तर त्याची किंमत समाजाला मोजणे भाग पडते.

विनोदाचे तत्त्वज्ञान काय असते ? सिनीसीझमचा उद्गाता डायोजेनीस (404 - 323 इ.स.पू.),प्लेटो (428-348इ.स.पू),ॲरिस्टॉटल(384-322इ.स.पू) पासून विनोदविषयक चिंतन सुरु झाले.थॉमस हॉब्ज (1598 - 1679) वॉल्टेअर (1694 - 1778), इमान्युएल कांट (1724 - 1804), ऑर्थर शॉपेनहॉवर (1788- 1860), बर्ट्रांड रसेल (1872 -1970) हे तत्त्वज्ञ त्यांच्या नर्मविनोदाबद्दल आणि विनोदविषयक विषयक चिंतनाबद्दल प्रसिध्द होते.अलिकडील कालात ओ. के. बोस्वॅम, डॅनियल सी.डॅनेट , रिचर्ड गेल, रिचर्ड वाटसन हे आहेत.समकालिनात जेम्स फीबलमन आणि ऑस्कर मेन्डेल म्हणून यांचे नाव घेणे अनिवार्य आहे.महाराष्ट्रात डॉ.सुरेंद्र बारलिंगे आणि मे.पु.रेगे यांच्या वक्तृत्वाला व लेखनाला विनोदाची झालर होती. अर्थात रेगेंचा विनोद तिरका आणि तिखटही असे.

नीत्सेच्या मते 'एखादी व्यक्ति एकाच वेळी विनोद करु शकते आणि त्याच वेळी ती साक्षात्कारी ही असू शकते काय ? याचे उत्तर शोधले तर विनोदविषयक गैरसमज मिटतील. विनोदाचे तत्त्वज्ञान समजावून घ्यावयाचे तर जॉन ॲलन पावलसचे 'मॅथेमॅटिक्स ॲण्ड ह्यूमर' आणि 'आय लाफ देअरफोर आय ॲम ' ही दोन पुस्तके नजरेखालून घातली पाहिजेत.ही फारशी समाधानकारक नाहीत पण ती (तत्त्वज्ञानाचा , विशेष करुन पाश्चात्य तत्त्वज्ञानाचा परिचय असणाऱ्या ) मराठी वाचकांना थोडा फार अंदाज देणारी आहेत.मराठीत विनोदाचे स्वरुप

श्रीनिवास हेमाडे, "*व्हाय सेड इट? !* "(आर. के. लक्ष्मण यांच्या व्यंगचित्राचे तात्त्विक विश्लेषण ) वसा, ऑक्टोबर- २००९ दिवाळी अंक, वर्ष सातवे, पान ३६ ते ४६, संपादक : प्रभाकर नारकर, कबीर प्रकाशन, १९ए/४०२, अक्षर पत्रकार सोसायटी, मागठाणे, बोरीवली(पू), मुंबई ६६

---

सांगणारे लेखन म्हणजे प्र.के. अत्रे यांचे विनोदगाथा (1970),अ.वा.वर्टी यांचे विनोदाचे आख्यान (1988), बाळ गाडगीळ यांचे विनोद तत्त्वज्ञान (1993)हे तीन ग्रंथ आहेत.तसेच अगदी अलिकडे गो.मा.पवार यांचे विनोद : तत्त्व आणि व्यवहार हा ग्रंथ प्रसिध्द झाला.यातील गाडगीळ आणि पवार यांची पुस्तके अतिशय चांगली असून विनोदाची चांगली तात्त्विक मीमांसा करणारी आहेत.ही मराठी समीक्षेतील मोलाची भर आहे.

खरे तर गार्सियाचे 'द सिक्रेट ऑफ सीनफिल्ड्स ह्यूमर ' या दीर्घलेखात तत्वज्ञानात्मक विनोद आढळेल.गार्सियाच्या मते 'खरा विनोद उचित काय नाही (किंवा कसे नसते)' हेच उचितपणे / यथार्थपणे सांगणारा असतो. त्या कथनातूनच संस्कृतीमधील आणि मानवी वर्तनातील गौण बाबी ,लहरीपणा आणि व्यस्तता याकडे लक्ष वेधले जाते.ती विकसनासाठी यथार्थ ठरते.

तत्त्वज्ञानातील विनोद शोधणे ही तर फारच जोखमीची बाब असते.तत्त्वज्ञान विनोदी असते म्हणजे नेमके काय असते ? 'उपहास' किंवा 'व्यंग 'ही मला वाटते, आपण तत्त्वज्ञानाची पध्दती बनवू शकतो.असे लेखन श्लेगेल,किर्केगार्ड आणि अडोर्नो यांचे असल्याचे दिसेल.अर्थात नीत्शेसुध्दा या यादीत मानाचे स्थान देता येईल.व्यंग निर्माण कधी होते ? तर एखाद्या विशिष्ट संदेशाचे संवाहन (किंवा संज्ञापन) संशयास्पद बनते आणि तत्त्वज्ञानच अविश्वासू बनते.

विनोदाचे तत्त्वज्ञान मुख्यतः विनोदाच्या अथवा हास्याची समाधानकारक व्याख्या विकसित करण्याकडे जाते.प्रस्तुतच्या विश्लेषणानुसार विनोदाच्या मुख्य तीन सिध्दान्तांची दखल घ्यावी लागते.

पहिला - विसंगती सिध्दान्त , दुसरा - श्रेष्ठत्व / वर्चस्ववादी सिध्दान्त आणि तिसरा - 'उपशम सिध्दान्त'.या खेरिज पॅट्रिशिया किथ - स्पेगल या विदुषीच्या मते असे आठ सिध्दान्त आहेत.जीवशास्त्रीय,वर्चस्ववादी,विसंगती,आश्चर्य, द्विधा मनःस्थिती, उपशमता, नवआकृतीवादी, मनोविश्लेषणवादी.तसे पाहता आणखी किमान शंभर सिध्दान्त सांगता येतील,असे अभ्यासकांचे मत आहे.विनोदाबद्दल उपस्थित केल्या जाणाऱ्या प्रश्नानुसार आणखी तीन सिध्दान्त जिम लिट्ल हा तत्त्वज्ञ साहित्यिक मांडतो.(अर्थात अशी कोणतीही वर्गवारी करणे,हे मोठ्या जोखमीचे काम आहे.त्यामुळे कदाचित चुकीच्या अपेक्षाही केल्या जावू शकतात.)

या सिध्दान्तांची सविस्तर चर्चा करण्याची ही जागा नाही.पण पहिली वर्गवारी महत्वाची व मूलभूत समजून त्यांचे स्वरप थोडक्यात लक्षात घेतले तर आर.के.लक्ष्मण यांच्या व्यंगचित्रांमधील विनोदाची नस शोधणे , ती यथार्थपणे समजावून घेणे सोपे जाईल.

(1) विसंगती सिध्दान्तानुसार (Incongruity Theory) संबंधित विषयातील विसंगती शोधण्यातून हास्यनिर्मिती होते.अर्थात विसंगतीत संदिग्धता,तार्किक अशक्यता,संदर्भाची अप्रस्तुतता, अनुपयुक्तता आणि अयोग्यता यामुळे विनोद निर्माण होतो.या सिध्दान्ताचे मूळ ॲरिस्टॉटलच्या ' ऱ्हेटॉरिक ' या ग्रंथात आहे.त्याच्या मते (बौध्दिक ) विनोद हा ' सुशिक्षित उध्दटपणाच ' आहे; विनोद म्हणजे खरी तर एक प्रकारची शिवीच आहे.त्यामुळे ती अशा आदर्श प्रकारे द्यावी की ज्यास द्यावयाची आहे त्यास जरा सुध्दा दुखापत होता कामा नये,असे ॲरिस्टॉटल म्हणतो.नंतरच्या कालखंडात इमान्युएल काण्ट (1724-1804) आणि सोरेन किर्केगार्ड (1813-1855) यांनी सौदर्यशास्त्रावर चर्चा करताना विनोदविषयक मते मांडली .पण जरा जपूनच. कारण तो मुख्य हेतू नव्हता.

(2) वर्चस्ववाची सिध्दान्त मुख्यतः थॉमस हॉब्ज (1588-1679)¾ाने मांडला.त्याच्या मते इतरांपेक्षा आपण श्रेष्ठ आहोत, याचा अचानकपणे आपल्याला साक्षात्कार झाला की इतरजन आपल्या विनोदाचा विषय बनतात आणि विनोद निर्मिती होते.प्लेटो आणि ॲरिस्टॉटल यांच्या समाजरचनेच्या श्रेष्ठतावादी अथवा अभिजनवादी भूमिकेच्या आधारे हॉब्जने आपले मत मांडले.

श्रीनिवास हेमाडे, "*व्हाय सेड इट? !* "(आर. के. लक्ष्मण यांच्या व्यंगचित्राचे तात्त्विक विश्लेषण ) वसा, ऑक्टोबर- २००९ दिवाळी अंक, वर्ष सातवे, पान ३६ ते ४६, संपादक : प्रभाकर नारकर, कबीर प्रकाशन, १९ए/४०२, अक्षर पत्रकार सोसायटी, मागठाणे, बोरीवली(पू), मुंबई ६६

---

(3) उपशमवाद मांडण्याचा मान हर्बर्ट स्पेन्सर (1820-1903) आणि सिग्मंड फ्राईड (1856-1939)यांच्याकडे जातो.दमनामुळे साठली गेलेली ऊर्जा मुक्त करण्याचा मार्ग म्हणून विनोद होतो.अशा विनोदातून ऊर्जा मुक्त होते किंवा तिचा विधायक उपयोगही होवू शकतो.

आता, विनोद म्हणजेकाय ? या प्रश्नात न अडकता आपण पुढे जावू.कारण हा प्रश्न अतिशय वादग्रस्त असून उत्तरे चकवा देणारीच जास्त असतात.शिवाय या क्षेत्रातील चिंतन बरेचसे अविश्वसनीय आणि म्हणून अचूक उत्तर देण्यास बऱ्याचदा अपयशी ठरते.परिणामी हा विषय अतिशय किरकोळ , अयथार्थ म्हणून हेटाळला जातो. पण तरीही गेल्या काही दशकात हा विषय आंतरविद्याशाखीय अध्ययन करण्याचा पात्रतेचा झाला आहे.तत्त्वज्ञान, मानववंशशास्त्र, मानसशास्त्र, समाजशास्त्र, जीवशास्त्र, चित्रपट आणि साहित्य अशा महत्वाच्या ज्ञानशाखा या विषयाकडे लक्ष देत आहेत.लक्ष्मण यांच्या व्यंगचित्रात वरील अर्थाचे विनोद आढळतात.

या मालमसाल्याच्या आधारे लक्ष्मण यांच्या व्यंगचित्राकडे पाहता येईल ः

**बोलण्याचा अर्थ ः**

यू सेड इट ! चा अर्थ काय ? तर काही तरी सांगणे ! बोलणे !! कसं बोललात ! हे स्पष्ट करणे.कोण सांगतय ? कुणाला ? काय ? कधी ? कुठे ? आणि का ? (ही पंचकसूत्री पत्रकारितेची कळसूत्र आहे. ) एक आपला नायक कॉमन मॅन वगळता 'इतर सारे अन्कॉमन मॅन' च (नॉट विमेन) ऐकत,सांगत,बोलत आहेत. आणि हा फक्त साक्षीदार आहे.मूक साक्षीदार. पण 'तो मूक आहे',असे म्हणणे योग्य होणार नाही.खरे तर तोच हे सारे सांगतोय. नेत्यांना,धोरणकर्त्यांना, नोकरशहांना, तस्करांना, इतर सामान्य जनांना आणि सरतेशेवटी तो स्वतःलाही सांगतोय.हा 'मास कम्यनिकेशन सिस्टीममधील' हा 'शब्देविण संवाद' एका चमत्कारीक, तऱ्हेवाईक विरोधाभासाला जन्म देतो.

म्हणणे, सांगणे याचा अर्थ आपले मत प्रकट करणे.याचाच अर्थ आपण इतरांविषयी बोलणे नव्हे तर स्वतःविषयी बोलणे असते.हा एक प्रकारचा विरचनावाद (deconstructionism) आहे. न सांगताच सांगत राहणे, ही केवळ भाषिक रचना नाही तर ती कला सुध्दा असते.

जगप्रसिध्द तत्त्वज्ञ बर्ट्रांड रसेलने (लक्ष्मण यांनी रसेलची आवर्जून भेट घेतली होती.रसेलच्या एका भाषिक चकव्यात सापडून स्वतःची चांगली फजितीही करवूनही घेतली होती) त्याच्या The Problems of Philosophy या पुस्तकात एक वचन दिले आहे .ते असे ः

" What Peter says about Paul<br>
Tells us more about Peter<br>
Than about Paul "

म्हणजे '' पीटरचे पॉलविषयीचे मत<br>
आपल्याला पॉलविषयी जेवढे सांगते<br>
त्यापेक्षा पीटरविषयी अधिक सांगते.''

या विधानाचे सामान्यीकरण केले तर पुढील अर्थ मिळतो ः

To say something about somebody<br>
Is to tell everything<br>
About Ouselves (rather to tell more )

' इतरांविषयी काहीतरी बोलणे
म्हणजेच इतरांपेक्षा स्वतःविषयीच सांगणे होय.
(किंबहुना जास्त सांगणे )

ज्या वस्तू, व्यक्तीविषयी जे आपण सांगतो त्यापेक्षा आपण स्वतःविषयीच अधिक सांगत असतो.इतरांविषयी काहीतरी बोलण्यासारखे आपणाकडे काही जास्तीचे असल्याशिवाय आपण त्यांचे समीक्षण,रसग्रहण करू शकत नाही, हे तर उघडच आहे.काहीएक योग्य - अयोग्यतेचे,चांगल्या - वाईटाचे मानदंड,निकष आपल्याकडे असल्याशिवाय इतरांविषयी काही बोलणे भौतिकदृष्ट्या शक्य होत नसते.याचा अर्थ स्वतःची मूल्यव्यवस्था निर्माण केल्याखेरिज इतरांचे मूल्यमापन करणे शक्य नसते.त्यामुळेच इतरांविषयी मत व्यक्त करणे म्हणजे स्वतःला मान्य असलेली मूल्यव्यवस्था स्पष्ट करणे असते.इतरांची व स्वतःची ही नैतिक, सांस्कृतिक पातळी तो स्पष्ट करणे असते.

**' अहं कॉमनास्मि'**

`You said it ' चे सांगणे ऐकताना मी काय ऐकतोय ? तर कुणीतरी काहीतरी मत व्यक्त करीत आहे आणि मी त्याचे रसग्रहण करीत आहे, त्याचा अर्थ समजावून घेत आहे, असे ' मी' ऐकत असतो. या संदर्भात व्यापक अर्थाने मी माझेच सांगणे ऐकत आहे.इथे मी केवळ प्रथम पुरुषी एकवचनी अहंकेंद्रवादी मी नाही तर व्यापक पातळीवर पोहोचलेला अतिभौतिक मी (Metaphysical Self) आहे.साऱ्या भारताचा मी आहे.म्हणून तर तो 'कॉमन' आहे.दर्जा आणखी वाढविलाच तर जगातीलच सामान्य माणसाचा (Transcedental Self) मी आहे. ''मी कोण?'' ही धार्मिक, अध्यात्मिक आणि तात्त्विक समस्या आहे. को ऽऽऽ हम् ' चे वैदिक तात्त्विक उत्तर ''अहं ब्रह्मास्मि'' असे असले तरी लक्ष्मण यांचे उत्तर ''अहं कॉमनास्मि'' असे आहे.

हा कॉमन मॅन केवळ सामान्य जनतेचे प्रतिनिधीत्व करणारा आहे असे नव्हे तर तो नेत्यांचाही मी आहे.कारण शेवटी नेतेही सामान्यजनांमधूनच गेलेले आहेत.असतात.कॉमन मॅन काही वेळेस अतिकंगाल दाखविला जात असला तरी तसा नाही,तसाच तो श्रीमंत,अतिश्रीमंत तर नाहीच नाही.साधारणतः तो कनिष्ट मध्यमवगीय असल्याचे दिसते.तो फिरतो सर्वत्र पण तो कनिष्ठ मध्यमवगीय आहे.ज्याच्या सांस्कृतिक,सामाजिक,राजकीय व नैतिक जाणीवा सजग आहेत, असा तो कॉमन मॅन आहे. एकाचवेळी तो महानगरी,शहरी, निमशहरी आणि ग्रामीण कॉमननेस आविष्कृत करणारा आहे.त्याच्यात अस्सल एतद्देशीय किंवा देशी 'व्हीलेज विज्डम' आहे.

**दोन कॉमन मॅन :**

इथे दोन कॉमन मॅन गृहीत धरता येतील. एक लक्ष्मण यांचा आणि दुसरा खरा हाडामांसाचा भारतीय कॉमन मॅन.दुसऱ्यावर पहिल्याचे आरोपण झाले आहे. या दोघांमध्ये फरक करता येईल पण त्यांना वेगळे करता येणार नाही, इतके त्यांच्यात अद्वैत आहे.

हाडामांसाच्या दुसऱ्या कॉमन मॅनला केंद्रीभूत धरुन विविधतेने विभागल्या गेलेल्या माणसाचा ल.सा.वि. म्हणून पहिला कॉमन मॅन म्हणजे भारतीय चित्त व मानसाचा अर्क असल्याचा लक्ष्मण यांचा दावा आहे ! पण तोच इतरांच्या तोंडून बोलत असल्यामुळे तो मूक साक्षीदार असल्याचा दावा कसा करता येईल ?

तो मूक नाहीच.विचार करणारा आहे. म्हणूनच तो अस्तित्वात आहे.रेने देकार्त (1596 - 1650) या फ्रेंच तत्त्वज्ञाने ' मी विचार करतो म्हणून मी आहे' (I think therefore I am ) असे शब्दबंध देवून

---

आधुनिक तत्त्वज्ञानाची उभारणी केली.माणसातील विचार करणारे द्रव्य म्हणून माणसाचे आत्म (Self ) देकार्त सिध्द करतो.जो विचार करीतच नाही तो अस्तित्वातच नसतो.प्राणी म्हणून तर केवळ जिवंत यंत्रे ठरतात तर माणूस मात्र अस्तित्वात असणारा अध्यात्मिक जीव ठरतो. ''मी विचारच करीत नाही'' असे म्हणणे काय किंवा ''मी विचार करीत होतो म्हणून मी अस्तित्वात होतो'' असे विनोदाने म्हंटले तरी ते सुध्दा विचार करणेच असल्याने कमालीचा बिनडोक माणूस सुध्दा माणूसच असतो, तो प्राणी नसतोच.

लक्ष्मण यांचा कॉमन मॅन अबोल विचार करणारा आहे.आता हा पहिला कॉमन मॅन आणि दुसरा खरा कॉमन मॅन दोघेही विचार करीत असतातच.पहिला हा तितका कॉमन नाही.पण दुसरा खरा कॉमन मॅन शहाणा आहे.त्याच्यात एक 'ग्रामीण बेरकीपणा' बरोबर 'शहरी बनेलपणा' देखील आहे.संवदेनशील विचारक असल्यामुळेच तर तो सत्ताबदल करतो.भारतीय जनमानसाचे हे व्यावहारिक सत्ताशास्त्र (Practicle Metaphysics ) लक्ष्मण मांडत आहेत, असेही म्हणता येते.पण ते त्यात यशस्वी झाले आहेत, असे कसे म्हणता येईल ?

पहिल्या कॉमन मॅनचा विनोद निर्विष, निखळ आहे.पण दुसरा घातक,विषारी विनोद करतोच की.त्याचा हा बेरकीपणा,बनेलपणा, घातकीपणा पहिल्या कॉमन मॅनमध्ये दिसतो का ? की त्यावर त्यांनी पांघरुन घातले आहे ?

शिवाय ज्या व्यवस्थेवर तो बोट ठेवतो त्या व्यवस्थेचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या पुण्यातील सिम्बायोसिस सारख्या एज्युकेशन मॉलमध्ये कॉमन मॅनचा पुतळा उभा राहावा, हा कॉमन मॅनचा दर्जा वाढल्याचे लक्षण आहे की कसली व्यावहारिक तडजोड आहे ? तिथे दुसऱ्या खऱ्या कॉमन मॅनला सहजी प्रवेश मिळेल का ? आणीबाणीतही लक्ष्मण बऱ्याच तडजोडी करताना आढळतात ((पान 144- 45 लक्ष्मणरेखा)), त्याची कारणे काय असावीत ? दर्जा वाढला असेल तर तो कॉमन राहात नाही.(*Then he is no more with us* ! )

खरे तर लक्ष्मणचा कॉमन मॅन कॉमन नाही,तो पुऱ्या वैचारिक व तात्त्विक ताकदीनीशी अस्तित्वात आलेला 'अनकॉमन कॉमन मॅन ' आहे.त्यामुळे त्याचे अनकॉमन राहणे हेच कॉमन असले पाहिजे .शिवाय जनक म्हणून लक्ष्मणही अनकॉमन राहिले पाहिजेत. तडजोडी होत असतील तर कॉमन मॅन खराच कॉमनच होतो.कारण खरा कॉमन मॅन तडजोडी करीत राहतो,ते त्याच्या जगण्याचे रहस्य असते.त्यामुळे कॉमन मॅन व जनक दोघेही अनकॉमन राहिले पाहिजेत. या अपेक्षा पूर्ण होत नसल्याचे त्यांचे आत्मचरित्र वाचताना लक्षात येतात.

शिवाय मुख्य मुद्दा असा की देव,देवता,मूर्ती, दानव , लोककथांमधील नायक यांना धक्का न लावता लक्ष्मण यांनी राजकीय व्यंगचित्रे काढली . ही चांगलीच बाब आहे.पण भारतीय जनमानस या वगळेलेल्या घटकांनीच बनत गेले आहे. त्याच्या अंर्तमनात खोलवर पापपुण्य,कर्म,पुनर्जन्म,मोक्ष,प्रकृति - पुरुष, शिवशक्ति इत्यादी गोष्ठी इतक्या ठाण मांडून बसल्या आहेत की त्यांचे दर्शन झाल्याशिवाय खरा दुसरा कॉमन दृग्गोचर होणेच शक्य नाही.मग कॉमन मॅन खरा कशावरुन ?

कॉमन मॅनकेंद्री राजकीय व्यंगचित्रांमध्ये विनोदाचे वर नमूद केलेले तीनही सिध्दान्त आढळतात.विसंगती तर थोरच आहे.शिवाय राजकीय व्यंगचित्राचे निकषही ते पूर्ण करतात.पण '' आपल्या व्यंगचित्रांमुळे राजकारण्यांनी बदलावे '' ही अपेक्षा ते का करतात ? तेच कळत नाही. ' राजकारण्यांचा, नेत्यांचा दर्जा बदलला तर मला निवृत्त व्हावे लागेल '' असे कसे ते म्हणू शकतात,तेच उमजत नाही. व्यंगचित्रे ही काही शस्त्रे अथवा अस्त्रे होवू शकत नाहीत, ती परिवतनाची साधने होवू शकत नाहीत, हा इतिहास ताजा आहे.ती निखळ आनंद देणारी, विचारप्रवृत्त करणारी व बोचरी टीका करणारी मूकभाष्ये असतात.हाच त्यांचा दर्जा आहे.नेते बदलत नाहीत उलट आणकी हीन पातळीला जातात, त्यांच्या व्यंगचित्राच्या आशयद्रव्याच्या

आविष्काराारत स्वच्छ पारदर्शीपणा आला आहे , हे स्वतःच लक्ष्मण कबूलही करतात. (पान 181 लक्ष्मणरेखा) व्यंगचित्रकाराला काम उरलेले नाही, असे ते सांगतातही.

पण उलट व्यंगचित्रकाराचे काम वाढले आहे. ते अधिक सजगपणे करण्याची गरज आहे.कारण कार्यकर्त्यामधील नेत्याविषयीची संवेदनशील हिंसक होण्याइतकी बेफाम झाली आहे.जणू काही नेते प्रेषितच बनत आहेत.त्यांची पूजा होते आहे.परिणामी व्यंगचित्रकाराला जास्तच वेगळ्या रितीचे आव्हान उभ`राहिले आहे.

**अनकॉमन वूमन ?**

लक्ष्मण हे स्वतः पारंपरिक उच्चवर्णीय , पुरुषप्रधान कुटूंबातील असल्याने त्यांच्या कॉमन मॅनवर सुध्दा पुरुषप्रधानतेची दाट छाया आहे.पहिल्या टप्प्यात कॉमन मॅन एकटा येतो, कालांतराने त्याची बायकोही येते. पण लक्ष्मण यांनी तिला मात्र 'कॉमन वुमन' चा दर्जा दिला नाही, असा मुख्य आक्षेप आणि इतर षंगिक आक्षेप ईपीडब्यूच्या सहाय्यक संपादक प्रीती संपत यांनी घेतला आहे.(EPW 10 ते 16 फेब्रुवारी 2007).त्याचा परामर्श येथे घेण्याची जागा नाही.ही अनकॉमन वूमन मूक नसून बोलते खरी पण ती सुध्दा अंतिम परवानगी नवऱ्याकडूनच घेते,त्यामुळे ही लक्ष्मण यांच्या अर्कवादाची चौकट सुध्दा पुरुषीच ठरते.तिला स्वतंत्र दर्जा नाही ! शिवाय 'राजकीय' चा अर्थ केवळ सत्तेचे राजकारण असा अर्थ घेतल्याने स्त्रीमुक्तिवादी चळवळीने लावलेला `Personal is Political and Political is Personal हा अर्थही लक्ष्मण यांच्या कुंचल्यातून निसटला आहे, असे प्रीतीचे निरीक्षण आहे.त्यामुळे लक्ष्मण यांनी स्वीकारलेली मूल्यव्यवस्था कितीही उदात्त असली तरी पुरुषांची पक्षपाती ठरते.

**ऑफिस ऑफिस !**

'ऑफिस ऑफिस ' ही मालिका पाहिली तर कॉमन मॅन खराच नागवला जातो ते कळते.पण कपडे काढून भ्रष्टाचाऱ्याला धडा शिकवा , ही मुन्नाभाईची गांधीगिरीही सिनेमातच राहते, हे कटू वास्तव स्वीकारणे भाग आहे.

संदर्भ :


- Fischer, Roger A. *Them Damned Pictures: Explorations in American Political Cartoon Art*. Archon Books, 1996.
- Press, Charles. *The Political Cartoon*.Fairleigh Dickinson, 1981.
- Sheppard, Alice. *Cartooning for Suffrage*. University of New Mexico Press, 1994.
- EPW Vol XLII no 8 February 10 – 16 , 2007
- 'लक्ष्मणरेखा', आर.के.लक्ष्मण, अनुवाद : अशोक जैन .